महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११००५.

महत्त्वाचे

क्रमांक पुविमं/माध्यमिक–क/उमा–अ/5797
पुणे-४११००५
दिनांक-28/१०/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व माध्यमिक शाळा व
कनिष्ठ महाविद्यालये
पुणे ,अहमदनगर, सोलापूर .

**विषय:-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) जुलै-ऑगस्ट-२०२४ परीक्षेची प्रमाणपत्रे वाटपाबाबत......

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१२वी) **जुलै-ऑगस्ट-२०२४** परीक्षेचा निकाल दि.**२३/०८/२०२४** रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व तपशीलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेखाचे वाटप दिनांक–**०२/०९/२०२४** रोजी करण्यात आलेले आहे.

सदरच्या परीक्षेमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे मंडळाकडे तयार आहेत. तरी **माध्य.शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्चमाध्य. प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) जुलै-ऑगस्ट-२०२४ परीक्षेची प्रमाणपत्र माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना दि.२५/१०/२०२४ रोजी पासून ते दि.२०/११/२०२४ रोजी पर्यंत पुणे विभागीय मंडळ कार्यालय पुणे येथे वितरीत करण्यात येणार आहे.** सदरचे प्रमाणपत्रे स्विकारणेसाठी शाळेच्या अधिकृत प्रतिनिधीस शिफारस पत्रासह मंडळ कार्यालयात पाठविण्यात यावे व उपरोक्त साहित्य तपासून ताब्यात घ्यावे. त्यामध्ये काही त्रुटी असल्यास तात्काळ मंडळास लेखी कळविण्यात यावे. सदरची प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना वाटप करून त्याचा अहवाल विभागीय मंडळास सादर करावा. याची सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

महत्वाची सूचना–

(सर्व प्रमाणपत्राचे वाटप शाळा/कनिष्ठ महाविद्यालयस्तरावर विद्यार्थ्यास समक्ष बोलावून त्यांच्याकडे सुपूर्त करावे. तशी नोंद शाळास्तवरावर घेण्यात यावी व प्रमाणपत्र (CERTIFICATE) वाटप केल्याचा अहवाल विभागीय मंडळास दिनांक **२९/११/२०२४** पर्यंत कळवावा.)

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे -४११००५

प्रत माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीसाठी
१) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे, अहमदनगर ,सोलापूर